# उप वनसंरक्षक यांच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील (लिपीक-टंकलेखक) सरळसेवा पदभरती 2020 च्या अनुषंगाने जाहिरात

************************************************************************

**क्रमांक : मशा/आस्था-1/अ-8(1)/अ.ज.सरळसेवा पदभरती/2020, दि. 12/02/2020**

उप वनसंरक्षक, अलिबाग यांच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील (लिपीक-टंकलेखक) सरळसेवा पदभरती 2020 करीता प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने, लिपीक टंकलेखक पदाकरीता पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार दि. 16/02/2020 रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सदर **लिपीक-टंकलेखक** पदाच्या परीक्षेसाठी पात्र अथवा अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग यांचे कार्यालयाचे www.raigad.gov.in/ raigad.gov.in या संकेतस्थळावर दि. 10/02/2020 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

लिपीक-टंकलेखक या पदासाठी पात्र उमेदवारांनी जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालयाचे www.raigad.gov.in/ raigad.gov.in या संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन त्यावर अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजचा रंगीत फोटो चिकटवून तो **स्वतःचे स्वाक्षरीने सांक्षाकीत करणे** आवश्यक आहे व सदर प्रवेशपत्र परीक्षेच्यावेळी उमेदवाराने आणणे आवश्यक आहे. प्रवेशपत्राशिवाय उमेदवाराला परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. तसेच सदर प्रवेशपत्र कोणत्याही उमेदवारास पोष्टाने अगर अन्य मार्गाने पाठविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच परिक्षेच्या दिवशी पात्र उमेदवारांनी जाहिरातीत नमूद केलेली ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पॅनकार्ड, स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र (Compulsory), उमेदवाराचे छायाचित्र व इतर मजकूर सुस्पष्ट दिसेल अशा मूळ ओळखपत्राच्या छायांकित प्रतींसह जे. एस. एम. कॉलेज, **अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड** (परिक्षा केंद्र) येथे प्रवेशपत्रांत नमूद केलेले वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

दिनांक:- 12 /02/2020
ठिकाण :- अलिबाग

**सही /- xxx**
**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती**
**तथा**
**उप वनसंरक्षक, अलिबाग.**